# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :- ०४/०८/२०२३

**ठराव क्रमांक :- ६०७**

**विषय क्रमांक :- १(ज)**

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.वर्षा अमर निंबाळकर आणि श्री.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली वॉर्ड क्र.१० मधील ऐतिहासिक ठिकाण म्हणून ओळख असलेल्या काळीखण येथे खण जतन करणेसाठी वडार समाजाच्या योगदानाची भावी पिढीला ओळख रहावी व युवकांना प्रेरणा मिळावी म्हणून या ऐतिहासिक स्थळाला कष्टकरी वडार समाज तलाव असे नामकरण करणेबाबत निर्णयार्थ आलेला प्रस्तावावर सन्मा.सदस्य यांनी केलेल्या सूचनेनुसार श्री.जय बजरंगबली तलाव असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्या सौ.भारती हेमंत दिगडे यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.९ मधील स.नं.२४४/३ येथील मनपा ओपन स्पेस विकसीत करण्यात आले आहे. सदर ओपन स्पेसला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले इको लायब्ररी असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.९ मधील स.नं.२५४/२ येथील मनपा ओपन स्पेस विकसीत करण्यात आले आहे. सदर ओपन स्पेसला स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यान असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.शेडजी सुबराव मोहिते यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील (१) प्रभाग क्र.८ मधील रेल्वे ब्रिज पासून चाणक्य चौकाकडे जाणाऱ्या व रेल्वे ब्रिज जवळून कृपामाई मारुती मंदिरकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरील चौकास राष्ट्रमाता जिजाऊ चौक असे नामकरण करणेस (२) कुपवाड वॉर्ड क्र.१ अवधूत कॉलनी मध्ये विचारमंच मंजूर झालेला आहे. त्या विचारमंचास शाहू-फूले-आंबेडकर विचारमंच असे नामकरण (३) कुपवाड वॉर्ड क्र.१ अवधूत कॉलनी / धोंडीकाकानगर मध्ये विचारमंच मंजूर झालेला आहे. त्या विचारमंचास राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विचारमंच असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.संतोष शिवदास पाटील यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.९ मधील दडगे प्लॉट जुना स.नं.३०३/२ मधील नागरिक, या भागातील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते व माजी नगरसेवक आप्पासाहेब बाळा दडगे यांचे नाव जाफरी स्ट्रीट रस्त्याच्या पुर्व बाजूच्या चौकास नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.९ मधील आप्पासाहेब बिरनाळे पब्लिक स्कुल ते स्टेट बँक कॉलनी / हाडको कॉलनी कडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरील चौकास स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज चौक असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.मनोज रघुनाथ सरगर यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.११ मधील संजयनगर,अभयनगर येथील आरोग्य केंद्र क्र.६ या शासनाने मंजुर केलेल्या दवाखान्याचे काम पुर्णत्वास आले असून, सदर दवाखान्यास कै.युवराज अर्जुन कांबळे असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- [signature] श्री.संजय मेंढे

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- [signature] श्री.शेडजी मोहिते

D. Suryavanshi
महापौर,

[signature]
नगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक** :- ०५ दिनांक :- ०४/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६०८

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.शुभांगी महेश साळुंखे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.११ मधील चिंतामणीनगर येथे असलेला रेल्वे ओव्हर ब्रिज,रेल्वेच्या चौपरीकरणाकरीता पाडण्यात आलेला आहे. त्यामुळे सद्या या पुलावरुन होणारी वाहतुक पुर्णपणे बंद आहे. सदर रेल्वे पुला खालून टाकण्यात आलेली ड्रेनेज पाईप तोडण्यात आलेली आहे. त्यामुळे चिंतामणीनगर,काकानगर,घनश्यामनगर येथील सांडपाण्याचा निचरा होत नसल्याने, पाणी साचून येथे दलदल निर्माण झाली आहे. यासाठी रेल्वे प्रशासनाकडे मनपाने पाठपुरावा करुन रेल्वे ट्रॅक खालून ड्रेनेज पाईप लाईन टाकण्याची कामगिरी रेल्वे विभागाकडून करुन घेणेसाठी तसेच, रामरहिम कॉलनी परिसर या ठिकाणी रेल्वे ट्रॅकच्या लगत रेल्वे प्रशासनाच्या हद्दीतील सांडपाण्यासाठी आर.सी.सी.बंदिस्त नाल्या बांधकाम करणेसाठी रेल्वे प्रशासनाशी चर्चा करुन, ड्रेनेज लाईन टाकणे व सांडपाणी निचरा करणेची कार्यवाही प्रशासनाने तात्काळ पुर्ण करावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री. संजय मेंढे ठराव बहुमताने मंजुर

अनुमोदक :- श्री. संतोष पाटील

D. P. Suryavanshi
महापौर,

शहर अभियंता

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- ०४/०८/२०२३

**महासभा क्रमांक :- ०५**

**ठराव क्रमांक :- ६०९**

**विषय क्रमांक :- १(ज)**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.शुभांगी महेश साळुंखे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.११ मधील चिंतामणीनगर येथे असलेला रेल्वे ओव्हर ब्रिज, रेल्वेच्या चौपदरीकरणाकरीता पाडण्यात आलेला आहे. या ठिकाणच्या नागरिकांच्या सोयी करीता स्थानिक नागरिकांना विश्वासात घेवून रेल्वे प्रशासनाची जागा सार्वजनिक बांधकाम विभागाची जागा व महापालिकेचे अंतर्गत रस्त्याची जागा एकत्र करुन होणाऱ्या जागेतून अंडरपास करणे शक्य होणार असल्याने नागरिकांना सुरक्षितपणे ये-जा करता येईल याकामी अंडरपास रस्ता तयार करणेकामी रेल्वे विभाग व महाराष्ट्र शासन यांच्याकडे प्रस्ताव सादर करुन मनपाने पाठपुरावा करुन अंडरपास रस्ता करणेकामी प्रशासनाने योग्यती कार्यवाही करावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री. संजय मेंढे

ठराव बहुमताने मंजुर

अनुमोदक :- श्री. संतोष पाटील

महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- ०४/०८/२०२३

**महासभा क्रमांक :- ०५**

ठराव क्रमांक :- ६१०

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.अभिजीत दत्तात्रय भोसले यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील २७ घोषित झोपडपट्टी धारकांचे ते रहात असलेल्या जागांवर त्यांची मागणी हक्कसदरी नोंद व्हावी म्हणून मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे आणि झालेल्या शासन निर्णयाप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रांतर्गत झोपडपट्टी वासियांना झोपडपट्टी मालकी हक्क प्रदान समिती स्थापन करुन, त्यायोगे झोपडपट्टी वासियांना मालकी हक्क देणेबाबत प्रशासनाने पुढील योग्यती कार्यवाही ठेवणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री. अभिजीत भोसले

ठराव बहुमताने मंजुर

D. P. Suryavanshi

महापौर,

अनुमोदक :- Nimbalkar सौ. वर्षा निंबाळकर

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक** :- ०५

दिनांक :- ०४/०८/२०२३

**ठराव क्रमांक** :- ६११

**विषय क्रमांक** :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.संजय नायकू मेंढे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील मिरज येथील जुना स.नं.२५९/३/२ (नविन स.नं.२११/३/२) ही अंदाजे २० गुंठे जागा वीरशैव लिंगायत माळी समाज यांच्या स्मशान भूमीची असून, ती केदारी तातोबा माळी अध्यक्ष वीरशैव लिंगायत माळी समाज यांचे नावावर आहे. परंतु पुर्वीचा जुना स.नं.२५९/३/२ (नविन स.नं.२११/३/२) वीरशैव लिंगायत माळी समाज यांच्या स्मशान भूमी हे आरक्षण कायम ठेवून, जुना स.नं.२५९/३/१ (नविन स.नं.२११/३/२) या असलेले स्मशानभूमीचे आरक्षण रद्द करणेबाबत मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्या सौ.बबिता संजय मेंढे यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मिरज येथील जुना स.नं.२५९/३/२ (नविन स.नं.२११/३/२) ही अंदाजे २० गुंठे जागा वीरशैव लिंगायत माळी समाज यांच्या स्मशानभूमीची असून, नविन डी.पी.नुसार मिरज येथील जुना स.नं.२६० व २६१ (नविनस.नं.२१२ व २१३) या जागेवर सुद्धा स्मशानभूमीचेच आरक्षण पडलेले आहे ते चुकीचे असून, तेथील स्मशानभूमीचे आरक्षण रद्द करणे गरजेचे आहे.

परंतु पुर्वीचे जुना स.नं.२५९/३/२ (नविन स.नं.२११/३/२) वीरशैव लिंगायत माळी समाज यांच्या स्मशानभूमी हे आरक्षण कायम ठेवून जुना स.नं.२६० व २६१ (नविन स.नं.२१२ व २३१) या जागेवरील स्मशान भूमीचे आरक्षण रद्द करणेबाबत मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.मैनुद्दीन शमशोद्दीन बागवान यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

कुपवाड स.नं.२१९/१, २२०/३, २२०/२ (नविन स.नं.१७१+१७२+१७३ कुपवाड भाग-२) मधील १२४१.३२ चौ.मी.क्षेत्रावर वर्किंग वुमेन्स हॉस्टेल असे आरक्षण आहे. तसेच, स.नं.२१९/१, २२०/३, २२१/१ (नविन स.नं.१७१+१७२+१७३ कुपवाड भाग-२) मधील १२८८.२५ चौ.मी.क्षेत्रावर शॉपिंग सेंटरचे आरक्षण आहे. सदरच्या दोन्ही आरक्षीत जागेच्या ठिकाणी नाला असल्याकारणाने तसेच, सदर ठिकाणी अद्याप लोकवस्ती झाली नसल्याने महापालिकेने सदरची आरक्षीत जागा ताब्यात घेतलेली नाही. तसेच, सदर जागेच्या मुळ मालकांनी आरक्षणात बदल करुन, सदर जागा रहिवास विभागात समाविष्ठ करणेची मागणी केलेली असल्याने, सदर जागा रहिवास विभागात समाविष्ठ करणेबाबत सूचना / हरकती मागवून त्यानुसार शासन स्तरावर प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. संजय मेंढे

ठराव बहुमताने मंजुर

अनुमोदक :- श्री. मैनुद्दीन बागवान

D. Suryavanshi

महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक** :- ०५

दिनांक :- ०४/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६१२

**विषय क्रमांक** :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.संजय नायकू मेंढे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेत गेल्या अनेक वर्षापासून बदली कर्मचारी कार्यरत आहेत. गेल्या अनेक वर्षापासून ते महापालिका सेवेत कायम करण्याबाबत मागणी करीत आहेत. तसेच ते महिन्यातून किमान २६ दिवस कामाची मागणी करीत आहेत. यापुर्वी त्याबाबतचे दोन ठराव मंजूर झाले असून त्यावर अद्याप अंतिम कार्यवाही झालेली नाही. यासाठी कार्यरत असणाऱ्या बदली कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याकरीता प्रस्ताव मा.शासनाकडे तात्काळ पाठविणे तसेच शासन निर्णय येईपर्यंत त्यांना किमान २६ दिवस काम देणेबाबत निर्णयार्थ आलेला प्रस्तावावर प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री. संजय मेंढे

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. संतोष पाटील

D. P. Suryavanshi

महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- ०४/०८/२०२३

**महासभा क्रमांक :- ०५**

**ठराव क्रमांक :- ६१३**

**विषय क्रमांक :- १(ज)**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.शुभांगी महेश साळुंखे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.११ मधील चिंतामणीनगर झोपडपट्टी येथील महिलांच्या साठीचे शौचालय जीर्ण व पडीक झाले असल्याने, निष्कासीत करणे आवश्यक असून ते निष्कासित करणेसाठी निर्णयार्थ आलेला प्रस्तावावर प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करणेस ही सभा आदेशित करीत असून, याकामी मा.आयुक्तसो यांना ही सभा प्राधिकृत करीत आहे.

सूचक :- श्री. मैनुद्दीन बागवान

ठराव बहुमताने मंजुर

महापौर,

अनुमोदक :- श्री. संतोष पाटील

सहा. प्रमुख (सांगली कुपवाड)

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :- ०४/०८/२०२३

**ठराव क्रमांक :- ६१४**

**विषय क्रमांक :- १(ज)**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली शहरातील सि.स.नं.२८ (नविन) २६१/३ ब (जुना) या मनपा मालकीच्या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन बांधण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला असून, सदर ठिकाणी सद्या काम सुरु असून या कामाची सुरक्षितता,पावित्र्य,देखभाल राहण्यासाठी विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या खालील २२ सामाजिक कार्यकर्त्यांची समिती गठीत करणेस ही सभा मान्यता देत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.दिग्विजय प्रदीप सूर्यवंशी,महापौर | १२. | श्री.चिंतामणी मच्छिंद्र कांबळे |
| २. | श्री.जगन्नाथ बापू ठोकळे, सदस्य | १३. | श्री.अनिल उर्फ ज्ञानू पांडूरंग साबळे |
| ३. | श्री.संतोष शिवदास पाटील, सदस्य | १४. | श्री.नंदकिशोर दगडू शिंदे |
| ४. | सौ.स्नेहल सचिन सावंत, सदस्य | १५. | श्री.प्रकाश विलास सदामते |
| ५. | श्री.बिरेंद्र भगवान थोरात माजी सदस्य | १६. | श्री.गजानन निशीकांत कांबळे |
| ६. | श्री.रमेश सुखदेव वाघमारे | १७. | श्री.विशाल भगवान चंदनशिवे |
| ७. | श्री.चंद्रकांत भिवा चौधरी | १८. | श्री.बापू शंकर कुदळे |
| ८. | सुरेश शिवराम दुधगांवकर | १९. | प्रा.श्री.रविंद्र नामदेव ढाले |
| ९. | श्री.विकास वसंतराव कांबळे | २०. | श्री.प्रमोद जयंत बनसोडे |
| १०. | सौ.छाया सतिश सर्वदे | २१. | श्री.प्रताप दिलीप कांबळे |
| ११. | श्री.हणमंत कृष्णा साबळे | २२. | श्री.किशोर वसंत होवाळे |

सूचक :- श्री. संजय मेंढे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापालिका सचिव
मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अनुमोदक :- श्री. संतोष पाटील

D.P. Suryavanshi
महापौर,

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :- ०४/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६१५

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

दि.१८/०२/२०२२ रोजीचा ठराव क्र.१७७ अन्वये खराडे पाटील ट्रेनिंग इन्स्टिट्युट सांगली या संस्थेस महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योगकर्ता विभाग मुंबई महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय-३ महानगरपालिका मार्ग मुंबई दि.२९/०८/२०१९ च्या आदेशान्वये मान्यता दिलेली आहे. सदर संस्था ही सांगली वॉर्ड क्र.१० मधील महानगरपालिकेच्या मालकीच्या समाज मंदिरामध्ये कौशाल्य विकास प्रशिक्षण वर्ग सुरु करणेस अकार्यक्षता दाखविली असल्याने, सदरचा ठराव रद्द करुन खराडे पाटील ट्रेनिंग इन्स्टिट्युटची उच्च स्तरीय अधिकारी यांच्या मार्फत समिती नेमुन चौकशी करणेकामी निर्णयार्थ आलेला प्रस्तावावर प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री. संजय मेंढे

अनुमोदक :- श्री. संतोष पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक** :- ०५

दिनांक :- ०४/०८/२०२३

**ठराव क्रमांक** :- ६१६

**विषय क्रमांक** :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.सविता शेडजी मोहिते यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड वॉर्ड क्र.२ मधील संत रोहिदास चौक पाण्याच्या टाकी जवळ मेन रोड लगत भाजी कट्टा बांधण्यात आलेला आहे. भाजी विक्रेत्यांसाठी एक स्थायी स्वरुपाचे ठिकाण उपलब्ध व्हावे या हेतूने भाजी विक्रेत्यांच्या व नागरिकांच्या मागणीवरुन भाजी कट्टयाची निर्मिती करण्यात आलेली आहे. सदर ठिकाणी बांधणेत आलेल्या भाजी कट्टयांवर पट्टयांचे मार्किंग करुन फळे व भाजी विक्रेत्यांकडून शुल्क आकारणी करुन त्यांना वापरास देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. शेडजी मोहिते

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi

अनुमोदक :- श्री. अभिजीत भोसले

महापौर,

नगरसचिव

नगरपालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५**

दिनांक :- ०४/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६१७

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.अभिजीत दत्तात्रय भोसले यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली वॉर्ड क्र.१८ डी मार्ट समोर स.नं.४४२१अ/१ ब नविन स.नं.१३९१अ /१ब वर गार्डनचे आरक्षण असून, सदर ठिकाणी १९९० पुर्वीचे वस्ती क्षेत्र असून, या क्षेत्रातील नागरीकांचे गुंठेवारी नियमितीकरणाचे प्रस्ताव महापालिकेत दाखल आहेत. सदर सर्व्हे नंबर वरील गार्डनचे आरक्षण रद्द करुन, रहिवास विभागात समाविष्ठ करणेस मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. अभिजीत भोसले

ठराव बहुमताने मंजुर

अनुमोदक :- Nimbalkar श्री. वर्षा निंबाळकर

D. P. Suryawanshi
महापौर,

ज.स.न.र.

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :- ०४/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६१८

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.अभिजीत दत्तात्रय भोसले यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली वॉर्ड क्र.१८ त्रिमुर्ती कॉलनी रहिवाशी क्षेत्रातील जुना स.नं.४४०/५ नविन स.नं.१३९ वर डी.पीरस्त्याचे आरक्षण असून, सदर ठिकाणी १९९० पुर्वी पासून रहिवास क्षेत्र अस्तित्वात आहे. या क्षेत्रातील नागरीकांचे गुंठेवारी नियमितीकरणाचे प्रस्ताव महापालिकेत दाखल आहेत. सदर डी.पी.रस्त्यास संलग्न समांतर रस्ता उपलब्ध असलेने, सदर सर्व्हे नंबर वरील डी.पी.रस्त्याचे आरक्षण रद्द करुन, रहिवास विभागात समाविष्ठ करणेस मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. अभिजीत भोसले ठराव बहुमताने मंजुर

अनुमोदक :- श्री. प्रकाश मुळके

D. P. Suryavanshi
महापौर,

स.दि.न.र.

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :- ०४/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६१९

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.अभिजीत दत्तात्रय भोसले यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली वॉर्ड क्र.१८ विठ्ठलनगर मोहिते मळा पश्चिम बाजूस असलेला जुना स.नं.४२८,४२९/१,४३०/१ नविन स.नं.१२५, १२६/१अ, १२७/१ वर अनुक्रमे प्ले ग्राऊंड ट्रेनिंग सेंटर आणि छत्रपती शाहू इन्स्टिट्युटचे आरक्षण असून, या क्षेत्रातील नागरीकांचे गुंठेवारी नियमितीकरणाचे प्रस्ताव महापालिकेत दाखल आहेत. सदर सर्व्हे नंबर वरील प्ले ग्राऊंड ट्रेनिंग सेंटर आणि छत्रपती शाहू इन्स्टिट्युटचे आरक्षण रद्द करुन, रहिवास विभागात समाविष्ठ करणेस मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- [signature] श्री. अभिजीत भोसले ठराव बहुमताने मंजुर

अनुमोदक :- [signature] सौ. वर्षा निंबाळकर

[signature]
महापौर,

[signature]
नगरसचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका